| | |
|---|---|
| MHSO180013712025 | दाखल दिनांक : ०३.०९.२०२५<br>नोंदणी दिनांक : ०३.०९.२०२५<br>निकाल दिनांक : १३.०३.२०२६<br>कालावधी :–वर्ष, ६ महिने, १० दिवस. |

**भाग – 'अ'**

| | |
|---|---|
| | **मंगळवेढा येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – एम.एस. माळी)<br>**न्यायनिर्णय**<br>**(घोषित दिनांक १३/०३/२०२६)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र. २२२/२०२५, निशाणी क्र. २५.**<br>**गु.र.नं. ५६३/२०२५ पोलीस ठाणे मंगळवेढा.** |
| फिर्यादी | महाराष्ट्र सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. भादुले. |
| आरोपी | सिध्देश्वर धुळाप्पा मळगे,<br>वय – ५१ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. तांडोर, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. जी.एस. व्हनगोंडे |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १५.०७.२०२५ |
| पहिली खबर दिनांक | १५.०७.२०२५ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०३.०९.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १६.१२.२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २२.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३.०३.२०२६ |
| निकालाची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेल ी शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४६८ भा.न्या. सु.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिध्देश्वर धुळाप्पा मळगे | भा.ना.सु.सं. चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | – | भा.न्या. सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## भाग – क
## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

| श्रेणी | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | इरफान दिलावर सवाळे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | नवाज फतरुद्दीन मुलाणी | साक्षीदार |

ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| – | – | – |

क. न्यायालयीन साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी**

अ. अभियोग पक्ष –

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | १३ | आरोपी व फिर्यादीमध्ये झालेली तडजोड पुरसीस |
| २. | २१ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | २२ | वैद्यकीय प्रमाणपत्र. |

ब. बचाव –

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**क. कोर्ट निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमाल –**

| अ.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | २२५/२०२५ पोलिस ठाणेचा | लोखंडी रिंगपाणा |

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द त्यांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ (या पुढे

संक्षिप्ततेकरीता भा.न्या.सं. म्हणून नमूद केलेले) चे कलम ११८(१), ११५(२) व ३५२ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याबाबत दाखल करण्यात आला आहे.

## अभियोग पक्षाचे खटल्याची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे :

२. फिर्यादी इरफान दिलावर सवाळे याने दि. १५.०७.२०२५ रोजी पोलीस ठाणे, मंगळवेढा येथे फिर्याद नोंदविली की, दि.१५.०७.२०२५ रोजी सकाळी ८.३० वाजणेच्या सुमारास उसाला पाणी देण्यासाठी फिर्यादी भिमा नदीच्या काटावर मौजे तांडोर गावचे हद्दीत त्यांची मोटार चालू करण्यासाठी नदीवर गेले होते. फिर्यादी मोटार चालू करित असताना तेथे आरोपी याची पण भिमा नदीवरती मोटार असल्याने तो ही मोटार चालू करण्यासाठी तेथे आला होता. त्यावेळी आरोपी फिर्यादीस, 'आयघाल्या तू मोटार चालू करायची नाही, इकडे यायचे नाही ही मोटार माझ्या शेताच्या हद्दीतून मोटार चालू करायसाठी जायचे नाही' असे म्हणून शिवीगाळी करुन हाताने मारहाण करुन त्यावेळी तेथे पडलेला लोखंडी रिंगपाना हातात घेवून आरोपीने फिर्यादीच्या उजव्या डोळयाचे खाली मारला. त्यामुळे फिर्यादीच्या उजव्या डोळयाच्या खाली रक्त येवून जखम झाली, त्यानंतर भांडणाचा आवाज ऐकून फिर्यादीचे मित्र सिध्दाराम महादेव काळे व नवाज मुलाणी हे तेथे येवून भांडणाची सोडवसोडव केली. त्यानंतर फिर्यादी व त्याच्यासोबत सिध्दाराम महादेव काळे यांनी आरोपीविरुध्द पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले असता, पोलिसांनी त्यांना दवाखाना यादी देवून उपचाराकरिता पाठविले व फिर्यादी उपचार घेवून आल्यानंतर तक्रार नोंद केली.

३. फिर्यादीच्या फिर्यादवरुन आरोपीविरुध्द मंगळवेढा पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र.५६३/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) व ३५२ अन्वये दाखल करण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास पो.हवालदार श्री. म.अ. खंडागळे यांनी केला. त्यांनी तपासकामी घटनास्थळ पंचनामा करुन घटनास्थळावरुन रिंगपाना जप्त केला, घटनेबाबत साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांची तपास टिपणे नोंदविली, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यांनी केलेल्या एकंदर तपासामध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. प्रस्तुतकामी आरोपी हजर झाल्यानंतर त्याच्याविरुध्द निशाणी क्र. ८ प्रमाणे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) व ३५२ अन्वये दोषारोप ठेवला.

सदरचा दोषारोप आरोपीस मराठी भाषेत वाचून, समजावून सांगितला असता, त्याने दोषारोप नाकबूल करून खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्याइतपत पुरावा नसल्याने, आरोपीचे जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

**६.** अभिलेखातील फिर्याद, पुरावा व युक्तीवाद यावरून खटल्याचे निर्णयाकरिता खालीलप्रमाणे प्रश्न उपस्थित होतात. त्यावर पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसाठी निष्कर्ष देण्यात येतो.

| क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करते काय, दि. १५.०७.२०२५ रोजी ८.३० वाजणेच्या सुमारास, तालुका मंगळवेढा येथील मौजे तांडोर गावातील आरोपीच्या शेतामध्ये, आरोपीने फिर्यादीच्या उजव्या डोळयाजवळ लोखंडी रिंगपानाने मारुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि त्याप्रमाणे त्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्ष पुढे असेही सिध्द करते काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, वरील आरोपीने फिर्यादीस बुक्क्यांनी मारहाण केली आणि त्याप्रमाणे त्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्ष पुढे असेही सिध्द करते काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, वरील आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळी केली व त्याचा अपमान केला व त्यानुसार त्यास उद्देशून व माहित असताना प्रक्षोभित केले, ज्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग किंवा इतर गुन्हा घडू शकला असता आणि त्याप्रमाणे त्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५२ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही. |
| ४. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता केली. |

## कारणमिमांसा

७. आरोपीविरुध्द निश्चित केलेले आरोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी व एक साक्षीदार यांची साक्ष नोंदविलेली आहे.

### प्रश्न क्र.१ ते ३ करिता :

८. वरील सर्व प्रश्न हे एकाच घटनेशी संबंधित असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर प्रश्नांबाबत एकत्रित विवेचन केले आहे.

९. अभियोग पक्षाने फिर्यादी इरफान दिलावर सावळे व साक्षीदार नवाज फतरुद्दीन मुलाणी यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, त्यांना घटनेबाबत काहीही माहिती नाही. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ साक्ष न दिल्याने अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले, त्यात देखील त्यांनी त्यांच्या जबाबातील नमूद मजकूर नाकारलेला आहे.

१०. फिर्यादीची साक्ष प्रकरणात अत्यंत महत्वाची असते परंतु, सदर प्रकरणातील फिर्यादी याने 'आरोपीने त्याच्या उजव्या डोळयाजवळ लोखंडी रिंगपाणाने व बुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळी केल्याचे तसेच सार्वजनिक शांतता भंग केल्याबाबत काहीही सांगितले नाही', त्यामुळे आरोपीचा गुन्हयाशी संबंध दर्शविणारा कुठलाही पुरावा समोर येऊ शकला नाही.

११. आरोपी पक्षातर्फे जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र. २२ हा स्वीकारण्यात आला असला तरी, एकंदरीत न्यायालयासमोर आलेला पुरावा पाहता, साक्षीदाराने घडलेल्या घटनेस अनुसरुन पुरावा दिलेला नसल्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्रातील फिर्यादीस झालेल्या जखमा या आरोपीने मारहाण केल्यामुळेच झाल्या आहेत, हे कोठेही सिध्द झालेले नाही. त्याचप्रमाणे आरोपीविरुध्द दाखल केलेली फिर्याद तसेच अभियोग पक्ष कथन करीत असल्याप्रमाणे घटना घडल्याचे निर्विवादपणे शाबित झालेले नाही.

१२. अभिलेखात हे देखील समोर आले आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यात तडजोड झाली आहे. फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील रहिवाशी आहेत. नि.क्र. १३ मधील पुरसीस

त्यांच्यातील तडजोडीस दुजोरा देते. त्यामुळेच फिर्यादी याची आरोपीविरुध्द साक्ष न देण्याचा कारणांचा उलगडा होतो. आरोपी व साक्षीदारामध्ये भविष्यात संबंध चांगले राहावेत, त्यांचे नात्यात द्वेष निर्माण होवू नये. त्यामुळे सदरचे प्रकरण पुढे चालविणे उचित वाटत नाही.

**१३.** उपरोक्त विवेचनावरुन आरोपीविरुध्द निश्चित केलेले दोषारोप शाबित करण्यासाठी सबळ, पुरेसा व विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. खटल्यातील फिर्यादी याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. आरोपीने फिर्यादीच्या उजव्या डोळयाजवळ व बुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळी केल्याचे तसेच सार्वजनिक शांतता भंग केल्याबाबत कोठेही समोर आलेले नाही. त्याअनुषंगाने आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२ अन्वये निश्चित केलेले दोषारोप शाबित होवू शकलेले नाहीत, या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. सबब, प्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

**<u>प्रश्न क्र.४ करिताः–</u>**

**१४.** वरील विवेचनावरुन आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) व ३५२ अन्वये निश्चित केलेले दोषारोप सिध्द न झाल्यामुळे, आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.

**१५.** सदर खटल्यामधील जप्त मुद्देमाल लोखंडी रिंगपाणा मूल्यहीन असल्यामुळे, आवाहन कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्न क्र.४ च्या निष्कर्षार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>:: आदेश ::</u>**

१. आरोपी सिध्देश्वर धुळाप्पा मळगे याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) व ३५२ आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल लोखंडी रिंगपाणा हा आवाहन कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४. आरोपीने कलम ४८१ भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या अंतर्गत सहा महिन्यांच्या कालावधीकरीता रक्कम रु.१५,०००/– चे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखित व उद्घोषित केला.)

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2026.03.13 11:21:39 +0530

मंगळवेढा.
दिनांक – १३/०३/२०२६

(एम.एस. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगळवेढा,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Priyank Tukaram Jadhav,<br>Stenographer Grade III |
| Name of the Court | : | Jt. Civil Judge Junior Division, Mangalwedha,<br>Dist. Solapur. |
| Order decided on | : | 13.03.2026 |
| Order signed by P.O | : | 13.03.2026 |
| Order uploaded on | : | 13.03.2026 |